**महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळांतर्गत अभ्यागत संपादकांच्या तात्पुरत्या सेवा घेण्याची पद्धत पुढे चालू ठेवणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः विनिमं-२०१८/प्र.क्र.६३/भाषा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २८ मे, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः मराठी भाषा विभाग, विनिमं-२०१४/१२/प्र.क्र.१८/भाषा-२, दि. २२.०७.२०१४
२) शासन निर्णय क्रमांकः मराठी भाषा विभाग, विनिमं-२०१३//प्र.क्र.३०/भाषा-२, दि. १८.०९.२०१४
३) शासन निर्णय क्रमांकः मराठी भाषा विभाग, विनिमं-२०१५/प्र.क्र.२२/२०१२/भाषा-२, दि. ०९.०७.२०१५.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाकडून मराठी भाषेत विश्वकोशाच्या संपादन कामाबरोबरच बालविश्वकोश व कुमार विश्वकोशांच्या संपादनाचे काम सुरु आहे. मराठी विश्वकोश खंडातील नोंदीचे लेखन तसेच संपादन कामांसाठी विविध विषयांतील तज्ज्ञांचे/लेखकांचे अभ्यागत संपादक या नात्याने सहाय्य घेण्यात येत असते. विश्वकोशाच्या सदर कामांसाठी आवश्यक असलेले तज्ज्ञांना संपादक म्हणून कायमस्वरुपी नेमणे तांत्रिक दृष्ट्या सोयीचे नसल्याने संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मराठी विश्वकोश खंडातील नोंदीच्या लेखन, संपादन कार्यार्थ विद्यापीठीय व महाविद्यालयीन ज्येष्ठ प्राध्यापक तसेच काही तांत्रिक विषयांतील ज्येष्ठ प्राध्यापक, संशोधक इत्यादी तज्ज्ञांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात संपादनाच्या कामांसाठी घेण्याचा प्रघात आहे. त्यानुसार संदर्भाधिन क्र. ३ येथील च्या शासन निर्णयान्वये दि. ०१ एप्रिल, २०१५ ते दि. ३१ मार्च, २०१८ (३ वर्ष) पर्यंत निरनिराळया विषयांच्या अनुषंगाने अभ्यागत संपादकांच्या सेवा घेण्याची पद्धत सुरु ठेवण्यासाठी निर्णय घेण्यात आला होता. विश्वकोशांचे सदर काम अद्यापही पुढे सुरु असल्याने अभ्यागत संपादकांच्या सेवा घेण्याची सदर पद्धत पुढील ३ वर्षाच्या कालावधीसाठी सुरु ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

मराठी विश्वकोशाच्या संपादन कार्यासंबंधात निरनिराळ्या विद्यापीठातील व महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक, संशोधक, संपादक इत्यादींच्या सेवा “अभ्यागत संपादक ” म्हणून विश्वकोश निर्मिती मंडळ कार्यालय, वाई, जि. सातारा येथे लिखाणासाठी व इतर संपादकीय कामांसाठी घेण्याबाबत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांना देण्यात आलेल्या अधिकारांनुसार दि. ३१.०३.२०१८ च्या पुढे दि.१ एप्रिल, २०१८ ते ३१ मार्च, २०२१ या कालावधी दरम्यान सदर पद्धत सुरु ठेवण्यास खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून शासन मंजुरी देत आहे :-

**अट क्र. १ :** खर्च विषयक प्रस्ताव सादर करताना नियमांचा / आदेशाचा आधार घेऊन तसेच एकूण खर्च विषयक सविस्तर तपशील शासनास उपलब्ध करुन द्यावा.

**अट क्र. २ :** सदर सेवा ह्या तात्पुरत्या स्वरुपात घेण्यात याव्यात तसेच सेवांसाठी शासनाने विहित केलेल्या दरानुसार अभ्यागत संपादकांचे मानधन अदा करण्यात यावे.

२) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांनी उपरोक्त अटींचे पालन होईल या दृष्टीने अभ्यागत संपादकांच्या कामांचे नियोजन करावे व त्यासंदर्भात आवश्यक ते निकष निश्चित करावेत.

३) यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी व सहाय्यक लेखाधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडएफ-०२, प्रधानशीर्ष - २२०५ - कला व संस्कृती, १०२ - कला व संस्कृती प्रचालन, (०१) (०२) - मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, (२२०५ ३१८१) योजनेतर- १६ प्रकाशने तसेच झेडएफ ०२ प्रधानशीर्ष २२०५ कला व संस्कृती १०२ कला व संस्कृती प्रचालन(०२)(०३) मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे विकास कार्यक्रम योजनांतर्गत (२२०५ ३२२३) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर बाबी) या दोन्ही लेखाशीर्षाखाली मंजूर तरतूदीतून मासिक निधीच्या उपलब्धतेनुसार भागविण्यात यावा.

५) सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक अनौसं-१८५/२०१८/व्यय-४, दि.२६.०४.२०१८ अन्वये दर्शविलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२८१३१२५५४१३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajashri Uday Bapat

Digitally signed by Rajashri Uday Bapat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Marathi Language Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0abe21e41785319194707f89dc0e9ab5156282f4a89952d9774a26fade711538, cn=Rajashri Uday Bapat
Date: 2018.05.28 13:13:36 +05'30'

**( राजश्री बापट )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
२. महालेखापाल महाराष्ट्र १ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
५. जिल्हा कोषाधिकारी, सातारा / उप कोषाधिकारी वाई, जि. सातारा.
६. वित्त विभाग (अर्थ-१४/व्यय-४/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई
७. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती (भाषा-२).